## ६. जीवघेण्या मारहाणीची शक्यता ओळखणे

१. जोडीदार रागावलेला असताना त्याची खूप भीती वाटते का?

होय/ नाही

२. कधी खूप प्रेमाचे, तर कधी खूप रागाचे असे त्याचे टोकाचे वागणे असते का?

होय/ नाही

३. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या माणसांमध्ये त्याचे उठणे बसणे वाढले आहे का?

होय/ नाही

४. पिस्तुल, चाकू किंवा इतर जीवघेणी शस्रे तो बाळगतो का?

होय/ नाही

५. दुसऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी अशी शस्रे वापरणे गरजेचे आहे, असे त्याला वाटते का?

होय/ नाही

६. तो व्यसनी आहे का?

होय/ नाही

७. तो तापट स्वभावाचा आहे का?

होय/ नाही

**एकूण गुण:**

**वरील तक्त्यातील एकापेक्षा जास्त प्रश्नांचे उत्तर 'होय' असेल तर जीवघेण्या मारहाणीची शक्यता जास्त आहे असे मानावे.**

**अनेकदा आपल्याकडे समुपदेशनासाठी किंवा सल्ला घेण्यासाठी माहेरची मंडळी मुलीला घेऊन येतात. सासरी भांडणे सुरु असतात. "मारहाण होत नाही" असे सर्व म्हणत असतात. अशावेळेस मारहाणीची शक्यता आहे किंवा नाही हे ओळखण्यासाठीचा हा आलेख स्तंभ:**

*(संदर्भ – 'चक्रभेद' – लेखन – मनीषा गुप्ते, अर्चना मोरे – मासूम प्रकाशन – वर्ष १० डिसेंबर २०१०)*